# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/01/2023 (शुक्रवार) सकाळ

## रेती चोरी करणारा आरोपीतांविरूद्ध कारवाई

**१) पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत दहेगांव रंगारी येथे दिनांक १९/०१/२०२३ चे ०६.३० वा. ते ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपल्या स्टाफसह पेट्रोलिंग करित असता मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून नाकाबंदी करून लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.- ४०/एल-५९६६ व लाल रंगाचा बिना नंबर ट्रॅक्टर याला थांबवून तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे- १) अजय सोनवने याने २) पंकज तांदुळकर दोन्ही रा. वलनी वस्ती खापरखेडा यांचे सांगणेवरून आपल्या ताब्यातील लाल रंगाचा ट्रॅक्टर व लाल रंगाचा बिना नंबरचा ट्रॅक्टर मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. मौजा दहेगाव येथे दिसुन आल्याने त्यास थांबण्याचा ईशारा केला असता आरोपी क्र. १) हा ट्रॅक्टर टॉली वलनी घाटातुन ट्रॉली सोडुन पळुन गेल्याने घटनास्थळावरुन ट्रॉली मधील एक ब्रॉस रेती किंमती अंदाजे ४०००/- रु., लाल रंगाचा ट्रॅक्टर क्र. एम. एच.- ४०/एल-५९६६ किंमती अंदाजे २,५०,०००/- रु., लाल रंगाचा बिना नंबर ट्रॅक्टर क्र. १,००,०००/-रु. असा एकुण ३,५४,०००/-रुपयाचा मुददेमाल कारवाई करुन आरोपीतांचे ताब्यातून जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे- पोलीस हवालदार ब. नं. ७१५ आशिष भुरे पो. स्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक प्रमोद भोयर ब. नं २०७४ मो नं. ८३२९२४७६०३ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. भिवापूर** :- अंतर्गत ०१ किमी अंतरावर पारवे पेट्रोल पंप जवळ महसुल तपासणी नाका येथे दिनांक १९/०१/२०२३ चे १९.१० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे आपल्या स्टाफसह पेट्रोलिंग करित असता मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून नाकाबंदी करून यातील टिप्पर ट्रक क्र. एम. एच-४०/बीएल-५६९० चे चालक आरोपी नामे- भिमेश राजकुमार मेश्राम, वय २३ वर्ष, रा. काम्पा ता. नागभिड जि. चंद्रपुर याला थांबवून तपासले असता सदर वाहनात विना रॉयल्टीची रेती एकुण ६ ब्रास रेती ३०००/-रू. प्रमाणे १८०००/- रूपये व टिप्पर ट्रक क्र एम. एच-४०/बी.एल- ५६९० किंमती अंदाजे १५,००,०००/-रू. असा एकुण १५,१८,०००/-रूपयाचा मुद्देमाल आरोपी ट्रक चालकाने शासनाचा महसुल डुबवुन अवैधरित्या चोरटी वाहतुक करतांना मिळून आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे- किशोर रतीपाल ठाकुर, ब. नं. २४ पो. स्टे भिवापुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. न. ९२४ प्रविण जाधव पोस्टे भिवापूर मो. नं. ९६८९९२५९२४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**